# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/01/2024 (गुरूवार) दुपार


## नागपूर ग्रामीण जिल्हयात नाकाबंदी दरम्यान वाहनांची तपासणी

नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या आदेशाने संपुर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयात दिनांक १०/०१/२०२४ रोजी रात्री दरम्यान जिल्हयातील ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील एकुण २३ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. या दरम्यान दुचाकी तसेच चारचाकी वाहने चेक करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान एकुण ६८५ वाहनांची तपासणी करण्यात आली असुन ट्रिपलसिट तसेच दुचाकी वाहनांसह वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांना अडवले जात होते. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या अशा एकुण ३० वाहन चालकांवर मोटार वाहन कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावर मौजा इंदोरा येथे दिनांक २२/१२/२०२३ ते दिनांक ०६/०१/२०२४ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– नेकसिंग भागिरथ गेहरवार, वय ६३ वर्ष यांचे त्यांचे रूम मध्ये ७२ लोखंडी तराफे सुर नदीचे पात्रातुन काढुन ठेवले होते व रूम लॉक करून ठेवले होते परंतु त्यांनी ठेवलेल्या ७२ तराफे पैकी १ तराफा तेथे दिसुन आले व बाकीचे तराफे दिसुन आले नाही. गावात तराफे बाबत विचारपुस करत असताना इंदोरा गावात राहणारा मानसिंग कच्छवा याने सांगितले होते कि, त्याला १५ दिवसापुर्वी रूम मध्ये लोखंडी तराफे दिसले होते. सुर नदीचे बंधाऱ्यात लावण्यात येणारे ७१ लोखंडी तराफे अंदाजे किंमती ५०,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी फॉरेन्सिक वाहनाने भेट दिली असुन सदर घटनास्थळी पोलीस हवालदार बाजनघाटे यांनी भेट दिली आहे तसेच आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बाजनघाटे मो. क्र. ९५६१०३४२८७ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर